**MHYA150005872020**

## <u>नियमित दिवाणी मुकदमा क्रं.१३/२०१५ मधील नि.क्र.९३ वरील आदेश</u>

१. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज हा त्याच्या विराधात झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करण्यासाठी तसेच साक्षीदाराचा उलट तपास घेण्याकरीता पुन्हा कोर्ट कमीशनर यांना पाठविण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला. प्रतीवादीतर्फे असे कथन करण्यात आले आहे की, न्यायालयाने वादीचा उलट तपास घेण्याकरीता कोर्ट कमीशनरची नेमणुक केली होती त्यानुसार प्रतीवादी यांना कोर्ट कमीशनर यांनी नोटीस काढुन प्रतीवादी यांना उलट तपासाची तारीख निf'चित केली होती पंरतु प्रतीवादीचे विधीज्ञ हे योगायोगाने त्यादिवशी बाहेरगावी गेले असल्यामुळे ते उलट तपास घेवू शकले नाही त्यामुळे सदर केसचा गुणागुणावरती निकाल होण्याकरीता प्रतीवादी यांना उलट तपास घेण्याची संधी देण्यात यावी त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी तर्फे सदर अर्जावरती म्हणणे दाखल करुन प्रतीवादीच्या कथनांचा इन्कार केला आहे. वादीचे असे कथन आहे की, दिनांक २३.०७.२०१९ रोजी कोर्ट कमीश्नर व्दारे वादीची साक्ष घेण्याचा अर्ज दाखल करण्यात आला होता त्यावरती प्रतीवादी यांनी खुप संधी देवून देखील म्हणणे दाखल केले नाही. दिनांक १५.०१.२०२० रोजी सदरचा अर्ज मंजुर करण्यात आला त्यानंतर दिनांक २६.०४.२०२३ रोजी वादीचा पुरावा नोंदविण्यात आला अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतीवादी हा सदर प्रकरण चालवित नसुन सदरचा अर्ज हा तीस हजार रुपये कॉस्ट करुन नामंजुर करावा

३. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा हा घोषणापत्र, कायम मनाई व आदेशात्म मनाई हुकुमाचा आदेश मिळण्यासाठी दाखल केल्याचे दिसून येते. प्रस्तुत दावा हा स्थावर मिळकती संदर्भात असल्यामुळे अर्जातील कारणे व दाव्याचे स्वरुप विचारात घेता सदर प्रतिवादीला उलटतपास घेण्याची संधी

देणे हे नैसर्गीक न्यायाप्रमाणे योग्य व संयुक्तीक आहे. परंतु वादीला त्यामुळे झालेल्या त्रासाबद्दल प्रतीवादीवरती कास्ट बसविणे देखील योग्य होणार आहे तसेच पुन्हा कोर्ट कमीश्नर यांना उलट तपास नोंदविण्यासाठी पाठवावे लागणार आहे त्यामुळे त्यांचा भत्ता देखील प्रतीवादीने देण्याचा आदेश करणे योग्य होणार आहे त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

प्रतीवादीचा निशाणी ९३ कडील अर्ज प्रतीवादीने वादीला १०००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो तसेच प्रतिवादीने कोर्ट कमीश्नर यांचे उलट तपास कामी जाण्याकरीता लागणारा भत्ता भरण्याचा आदेश देखील करण्यता येतो.

दि.१५/०२/२०२४

(वि.सा.शिंदे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नेर .